# गाडगीळांच्या कथेतील निसर्ग आणि काव्यात्मकता

**डॉ. सोमनाथ कोमरपंत**

मराठी कथाविश्वात गुणात्मक परिवर्तन घडवून आणणाऱ्या कथाकारांमध्ये गंगाधर गाडगीळ यांचे स्थान महत्त्वाचे आहे. मराठी नवकथेचे ते शिल्पकार मानले जातात. अनेक वाङ्मयप्रकार त्यांनी हाताळले. त्यात यश संपादन केले. तरी कथाक्षेत्रातील त्यांचे कर्तृत्व अजोड स्वरूपाचे ठरले. प्रत्यही बदलणाऱ्या मध्यमवर्गीय जीवनातील आंतरप्रवृत्तींचा वेध घेण्यात त्यांची प्रतिभा सदैव मग्न राहिली. नागर जीवनचित्रणापुरती ती सीमित राहिली, तरी सम्यक् जीवनदर्शनाचा तिचा आवाका फार मोठा आहे. अफाट मानवी जीवनाची बहुरंगी विविधता टिपण्यात, गुंतागुंतीचे चित्रण करण्यात आणि विसंगतीचे दर्शन घडविण्यात तिला यश प्राप्त झाले आहे.

गंगाधर गाडगीळ यांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व प्रसन्न व भावसमृद्ध आहे. मानवी मनोव्यापारांचे सूक्ष्म निरीक्षण, प्रखर बुद्धिमत्ता, उत्तुंग कल्पनाशक्ती आणि भाषाप्रभुत्व इ. गुणांचा समुच्चय या व्यक्तिमत्त्वात झालेला आहे. त्याचा आत्मनिष्ठ आविष्कार म्हणजे त्यांची कथासृष्टी.

गाडगीळ यांनी घडविलेल्या मानसदर्शनाने द्वितीय महायुद्धोत्तर काळात मराठी कथेने कात टाकली. तिला नवी मिती लाभली. ती संकेतमुक्त झाली. वास्तवाभिमुख झाली. कथात्म साहित्याच्या रूढ चाकोऱ्या मोडून ती गतिमान झाली. जीवनस्पंदनांचा, मानवी अंतरंगातील जाणिवांचा आणि नेणिवांचा ती शोध घेऊ लागली. गाडगीळांनी मराठी कथाविश्वात टाकलेले हे दमदार पाऊल क्रांतिकारी स्वरूपाचे ठरले.

गंगाधर गाडगीळ यांच्या कथालेखनातील निसर्गचित्रण आणि काव्यात्मकता या घटकांचा संक्षिप्त परामर्श येथे घ्यायचा आहे. त्यांच्या कथालेखनाच्या गुणवैशिष्ट्याविषयी विचार करताना या घटकांचा आवर्जून विचार करावा लागतो. एकीकडे गुंतागुंतीच्या उद्ध्वस्त विश्वाचे उपहासात्मक शैलीत भेदक दर्शन घडविणारे गाडगीळ तेवढ्याच सामर्थ्यानिशी तरल मनोविश्वाचे काव्यात्म दर्शन घडवितात. त्यांच्या कथानिवेदनातील काव्यात्मकतेची प्रगाढता वाढविणारा निसर्ग हा महत्त्वाचा घटक आहे. निखळ निसर्गचित्रण आणि काव्यात्मकता यांच्या अंगाने

फुलत जाणाऱ्या कथा त्यांच्या एकूण कथासंभारामध्ये तशा थोड्याच आहेत, पण गुणवत्तेच्या दृष्टीने त्या लक्षणीय आहेत. मानवी जीवनातील भावकोमल छटा ते तरल संवेदनानिष्ठ शैलीतून रेखाटतात. अर्थात गाडगीळांच्या कथाविश्वाच्या प्रकृतिधर्माशी त्या विसंगत वाटत नाहीत. जीवनाच्या सम्यक् अनुभूतींचे रंग न्याहाळणाऱ्या व त्या रेखीवपणे टिपणाऱ्या त्यांच्या प्रातिभधर्माचे दर्शन येथे घडते. एरव्ही जीवनवास्तवातील अंतर्विरोध टिपताना उपहास, उपरोध आणि नर्मविनोद यांचा वापर करणारे गाडगीळ जाणीव-नेणिवेच्या प्रवाहाचे अथवा अनुभवप्रवाहाचे चित्रण करताना मात्र हळुवारपणे काव्यात्म शैलीचा स्वीकार करतात. त्यांच्या या निवेदनात्मकतेला प्रवाही लय आहे. साऱ्या संज्ञाशक्तींचा समुच्चय होऊन हे कथानिवेदन येते. निसर्गाचे केवळ निसर्ग म्हणून चित्रण त्यांच्या कथेत येत नाही. कथावस्तूशी ते एकजीव होऊन येते. निसर्गाचे सहजतेने ते मानवीकरण करून टाकतात. निसर्ग आणि माणूस यांच्यातील समानधर्मेपणा हेरतात. या प्रक्रियेत निसर्ग आगळी रूपकळा धारण करतो. त्यामुळे जी वातावरणनिर्मिती होते तीमुळे कथेत विशिष्ट भाववृत्तीही निर्माण होते. प्रतीकात्म आशयामुळे कथा फुलत जाते. मात्र शाब्दिक फुलोरा म्हणजे काव्यात्मकता नव्हे, याचे भान गाडगीळांना आहे. जीवनाची सुसंवादी लय असलेली अंगभूत काव्यात्मकता त्यांना अभिप्रेत असते. आपणास प्रतीत झालेल्या जीवनचैतन्याचे दर्शन घडविण्यासाठी अभिव्यक्तीच्या अनेकविध वळणा-वाकणांचा जाणीवपूर्वक केलेला उपयोग असे त्याचे स्वरूप आहे. येथेही त्यांची प्रयोगशीलता दिसून येते. अशा स्वरूपाच्या कथेतील निसर्ग आणि काव्यात्मकता हे घटक बऱ्याच वेळा अलग करता येत नाहीत. या कथांतून निसर्गचित्रे रेखाटली जातात तीच मुळी काव्यात्म प्रतिमांच्या संघातामधून. त्या दोहोंची संमिश्र घट्ट वीण हेच त्या रचनाबंधाचे गुणवैशिष्ट्य असते. म्हणून अभिव्यक्तीच्या या घटकांचा स्फुट परामर्श न घेता समांतरपणे तो घेणे संयुक्तिक ठरेल असे वाटते.

'भिरभिरे' या कथेत गाडगीळांनी स्वप्नवास्तवाच्या हिंदोळ्यावर झोके घेणाऱ्या 'तो' आणि 'ती' यांचे भावविश्व तरलपणे रेखाटले आहे. तारुण्यसुलभ विभ्रमांचे संवादात्मक शैलीत त्यांनी चित्रण केले आहे. तीत नर्मविनोद आहे. त्यामुळे तरुणाईचे स्वप्नरंग खुललेले आहेत. कथेच्या सुरुवातीला मात्र पार्श्वभूमी म्हणून निसर्गाचे चित्रण येते. मानवी भावभावनांच्या कठोर वास्तवाचा त्याला स्पर्श आहे.

उदा. ''वाळलेले गवत म्हाताऱ्या माणसाच्या दाढीसारखे दिसत होते. आणि वाऱ्याने ते हलले की, तो किल्ला मृत आहे हे एकदम भीतीदायकपणे जाणवत होते.''



''त्या तटबंदीच्या टोकावर एक वठलेले पांढरे झाड आपल्या निष्पर्ण फांद्या फिस्कारून उभे होते. त्या निष्पर्ण गाठींनी भरलेल्या फांद्या एखाद्या जखिणीच्या बोटांसारख्या दिसत होत्या.''

''संध्याकाळच्या तांबूस प्रकाशात विषण्ण हास्य करीत ती कोसळणारी तटबंदी अफाट ओसाड भासणाऱ्या समुद्राकडे पाहत होती. दुष्ट माणसाच्या नजरेतील निरागसतेसारखा समुद्राचा निळा नितळ रंग दिसत होता.''

''भरतीच्या लाटांचे पाणी फसवेपणाने मागे सरकून पुन्हा अधिकच पुढे सरकत होते.''

या चित्राशी अंतर्विरोधी असे चित्र कथाप्रवाहात येते :

''कोण्या पोराने एका चकाकत्या रंगाचे भिरभिरे त्या तटावर अडकवले होते. ते सारखे भिरभिरत होते.''

कथेच्या शेवटी काव्यात्म अंगाने येणारे भाववृत्तींचे आवर्तन कथेच्या आशयाला प्रगाढ बनविते.

'टिंबे' ही नितांत सुंदर कथा आहे. या कथेतही प्रणयी युगुलाचे भावविश्व रेखाटले आहे. त्यांच्या बोटीच्या प्रवासातील क्षणचित्रे या कथेत रेखाटली आहेत. यातील निसर्गवर्णन व काव्यात्मकता वेगळी करता येत नाहीत. चिमटीत न मावणाऱ्या तृप्त, भावसमृद्ध क्षणांचे तरंग लेखकाने येथे टिपले आहेत. रात्रीच्या वेळचे बोटीतील प्रवासाचे चित्र असे रेखाटले आहे :

''चांदण्याच्या मच्छरदाणीत, लाटांच्या रागदारीवर बोट डुलत होती. समुद्रावर लाटांचे रुपेरी नक्षीकाम विणत पुढे चालली होती. तिच्या फुगीर नाळीच्या एका बाजूला एक हिरवा प्रकाशदूत बसला होता आणि त्याच्या हातातून नाळीखालच्या फेसावर हिरवी रांगोळी भुरभुरत होती. उंच डोलकाठीवरचा चिमखडा दिवा लाटांनी म्हटलेले गाणे काळोखावर लिहीत होता.''

यातील प्रतिमांचे सौंदर्य विलोभनीय आहे. लेखकाच्या सूक्ष्म अवलोकनशक्तीचे आणि सौंदर्यदृष्टीचेही येथे दर्शन घडते.

पहाटेच्या वातावरणाचेही रमणीय चित्र असे साकार होते:

''सकाळी तो उठला तेव्हा रात्रीचे काळे मांजर टोपलीतून उठून गेले होते. आणि पिंगट रंगाची पहाट मिटलेल्या डोळ्यांनी त्या टोपलीत चाचपडत होती. समुद्राचे पाणी फिक्कट हिरव्या रंगाचे दिसत होते आणि आकाशाचा गडद रंग उतरला होता.''

'नवी सायकल' ही कथा फँटसीच्या अंगाने फुलत गेलेली आहे. या कथेत रंगविलेला निसर्ग हा परीकथेतील निसर्ग आहे. अद्‌भुताचे रंग त्यात मिसळले आहेत.

'अदृश्य किरण' या कथेतील निवेदनशैली प्रतिमायुक्त आहे. निसर्गचित्रण व काव्यात्मकता यांचा मनोज्ञ मिलाफ पुढील निवेदनात आढळतो :

"विश्वाच्या रुद्रवीणेचा एक झंकारच तेथे गोठला होता. चेतनेची एक वेडी लहर जड स्वरूपात अवतरली होती. जीवननाट्यातला एक भव्य प्रसंग घडत असता, काळाने आपल्या बर्फाच्या बोटांच्या स्पर्शाने तो थिजवला होता, आणि अवकाशाच्या बाटलीत भरून ठेवला होता."

या पार्श्वभूमीवर कथानायक श्रीकांतच्या संवेदनाप्रवाहातील आवेग-प्रवेगांचे प्रत्ययकारी चित्रण लेखकाने केलेले आहे :

"थंडी अंगाला बिलगली होती आणि मधून मधून चावत होती. रात्र धुक्याचे नि:श्वास डोंगराच्या आणि झाडांच्या मस्तकावर सोडीत होती. त्या नि:श्वासांच्या स्पर्शाने त्यांची अंगे पुलकित झाली होती. पाण्यात स्पंज तरंगावा तसे ते धुके हवेत तरंगत सावकाश दूर चालले होते. त्या धुक्यामुळे सारे अस्पष्ट झाले होते. आणि तरी काही तरी स्पष्ट झाल्यासारखे वाटत होते. त्या धुक्यामुळे साऱ्या गोष्टींना दूरत्व प्राप्त झाले होते आणि कशाच्या तरी जवळ आल्यासारखे वाटत होते..."

मानवी जाणीव-नेणिवेतील नाट्य हेरणारी कल्पनाशक्ती येथे दृग्गोचर होते. जाणिवेच्या खोल प्रवाहात अवगाहन करण्याची प्रवृत्ती 'अद्य शरद् प्रवृत्त:' सारख्या कथेतही आढळते. नव्या जीवनदर्शनाचा आणि त्यातून उमललेल्या स्वतंत्र स्फुरणाचा प्रत्यय या कथेतील मंदाकिनीच्या व्यक्तिरेखेद्वारा येतो. तिच्या शारीर-मानस अवस्थेचे चित्रण नेमक्या शब्दांत लेखकाने केलेले आहे :

"तिच्या शरीरावर कोणी आनंदाच्या संवेदनांची संततधार धरली होती आणि मध्येच ती नाकातोंडात जाऊन तिचे मन गुदमरत होते. बहुरंगी प्रकाशाचा, रानवट गंधाचा, टुचटुचणाऱ्या स्पर्शाचा, विविध ध्वनींच्या मंद रागदारीचा असा विलक्षण साक्षात्कार तिला अनेक दिवसांत झाला नव्हता. तिच्या शरीरात कोणी ते एक रसायन टाकले होते." रूप-गंध-स्पर्श-नाद-संवेदनात्मक अनुभवाचे प्रत्ययकारी दर्शन येथे घडते. निसर्गप्रतिमा आणि संज्ञाप्रवाहाचे काव्यात्म वर्णन यांनी ही कथा ओथंबून आलेली आहे. निसर्गाशी एकतान होऊ पाहणाऱ्या मंदाकिनीच्या तरल मनाचे दर्शन पुढील शब्दांतून होते:

"तिला वाटले की, आपण झाडांच्या पानांपानांच्या फटीतून उन्हासारखे



झिरपावे, पाण्याच्या प्रवाहातले थरथरते प्रतिबिंब व्हावे, होडीच्या मागे उमटणारी रेषा व्हावे, धुक्याने झाकलेली, पोपटी सौंदर्याने नटलेली दरी व्हावे, बैलगाडीच्या मागे उडणारी सोनेरी धूळ व्हावे, पाण्यात चुबकले जाणारे वस्त्र व्हावे."

'गादीवर घातलेल्या परीटघडीच्या पलंगपोसासारखी पांढरी दुपार' 'पैलतीराला आलेली दिवसाची नाव', 'काळोखाचा किनारा', 'गोड दुपारी वर आलेले पांढऱ्या ढगांचे इवलेसे सायटे आणि अंधाराचे अस्वल' अशा निसर्गप्रतिमांच्या साहाय्याने लेखकाने वातावरणनिर्मिती साधलेली आहे.

मंदाकिनीच्या उत्फुल्ल भावनांचे चित्रण लेखकाने काव्यात्म शैलीत केले आहे:

". . . मग तिच्या शरीराला विलक्षण सुखदायक असा थकवा आला. मनाला गोड ग्लानी आली. तिच्या मनातल्या पात्रात भावनांची आणि संवेदनांची नवी नवी मिश्रणे झाली होती आणि त्यातून अनुभूतींची नवी रसायने निर्माण झाली होती. माणसाच्या मानगुटीवर बसलेल्या भूतकालाच्या पिशाच्च्याच्या तावडीतून ती निसटली होती. उरावरचा भविष्याचा धोंडा उलथून पडला होता आणि ती फक्त आता – ह्या क्षणात जगत होती. चिरयौवन, मुक्ती म्हणतात ती हीच असेल कदाचित!"

'उंट आणि लंबक' या कथेतही काव्यात्मकतेची अंत:स्थ धारा आहे. कृष्णाबाईंच्या अंतरंगातील संवेदनाप्रवाहाचे चित्रण करताना, मनातील तांडवाचे प्रत्ययकारी दर्शन घडविताना लेखकाने काव्यात्मकतेचा आधार घेतलेला आहे.

रघुनाथरावांच्या कौटुंबिक सौख्याबद्दल पुढील निवेदन येते. ". . . एक सुंदर भावाकृती प्रीतीच्या रेशमी धाग्यांनी गुंफली होती . . . प्रत्येकाच्या वृत्तीतल्या नव्या नव्या कळ्या उमलत होत्या . . . प्रसन्नता फुलली होती."

अविनाशच्या अंतरंगातील वासनांचे तांडव व भावप्रक्षोभाचे चित्रण लेखकाने संज्ञाप्रवाहाच्या साहाय्याने केले आहे. कृष्णाबाईंना एकाएकी त्याच्याविषयी आकर्षण वाटू लागले. त्या क्षणाचे तरंग असे टिपलेले आहेत:

"कृष्णाबाईंचे लक्ष त्याच्या कृश मनगटाकडे गेले. त्याच्या स्वप्नाच्या द्रवापासून निर्माण झालेल्या डोळ्यांकडे गेले आणि त्यांना का कोण जाणे तो अगदी जवळचा वाटू लागला." याच प्रतिमेची आवर्तने समुचित पद्धतीने योजून या कथेचा शेवट लेखकाने परिणामकारकरीतीने केलेला आहे.

'फणफणलेला दिवस' या कथेत निवेदकाच्या अंत:करणातील भावस्थितीचे वर्णन निसर्गप्रतिमांच्या साहाय्याने लेखकाने केले आहे.

सुरुवातीलाच वातावरणातील कंटाळवाणेपणाचे, निराशेचे प्रत्ययकारी चित्र रेखाटले आहे:

"... पाऊस कधी शिंतडतो, कधी कोसळतो, कधी घोंगावत, गुरगुरत चोहोबाजूंनी घेरतो. कधी आपला तासन् तास दिवसेंदिवस गळतच राहतो, खिन्नतेत खिन्नता ठिबकत राहते ... एकामागून एक बिनचेहऱ्याचे दिवस एक एक चाचपडते पाऊल टाकीत अखेर अंधारात बुडत आहेत. सदा घुसमटलेले, घुसमटून आटोपणारे."

"समोरच्या त्या झाडावरच्या घरट्यातून एक कावळ्याचे पोर खालच्या बैठ्या छपरावर पडले आहे. आणि त्याच्या बोडक्या माथ्यावर पाऊस सकाळपासून ठिबकतो आहे. अपुऱ्या पिसांतून त्याची लाल लाल मान चिघळलेल्या जखमेसारखी दिसते आहे."

या पार्श्वभूमीवर निवेदकाच्या मनोवस्थेचे चित्रण येते, त्याच्या जाणीव-नेणिवेचे चित्र साकार होते. "... डोके कसे सुन्न झाले आहे. वाटतंय की मानेखालच्या शरीरापासून विलग झाले आहे. कानातून किरकिराटाच्या लांबच लांब सुरनळ्या सारख्या बाहेर पडत आहेत आणि पापण्यांखाली कापूर पेटला आहे. आपल्याच गरम श्वासाचा भपकारा मला असह्य वाटतो आहे. आणि मस्तकातला तो सूक्ष्म ठणका नेमका कुठे आहे ते आता मला बरोबर सापडले आहे." प्रतिमाविश्वाच्या आवर्तनाने परिणाम साधणे ही लेखकाची खास शैली या कथेतही आढळते. मानवी संवेदना आणि निसर्गचित्र यांचे साहचर्य येथे आढळते. उदा.

"... मग बायको माझ्या तोंडात चार बेदाणे टाकते. मी ते चावतो. जिभेवरच्या बेचवपणाच्या थरातून त्यांची आंबटगोड चव जराशी आत पाझरते. ढगातून एखादा उन्हाचा कवडसा पाझरावा तसा. मग पुन्हा तोंडाचा कोपरान् कोपरा बेचवपणाने भरून जातो."

पुढे संवेदनाप्रवाहाचे काव्यात्म चित्रांकन होते :

"... वेदनेतून वेदना जन्माला येते आणि वेदनेच्या समेवर आयुष्य संपते. वेदनेची न संपणारी वीण लांबतच जाते आणि लांबत जाणाऱ्या त्या विणीच्या मागोमाग धावताना माझी नजर फाटते. डोळे बाहेर लोंबू लागतात."

कथेच्या शेवटी नेणिवेचे अमूर्त नादविश्व अंतर्मनात साकार होते. गाडगीळांच्या तरल प्रतिभेचा परमोच्च बिंदू येथे आढळतो: "... दुरून कुठून तरी शांततेच्या गाभाऱ्यातून घंटानाद कानांवर येतो. आसपास कोठेही शिवालयाचे शिखर दिसत नाही. आणि त्या अज्ञात शिवालयाचा शोध करण्याचा प्रयत्नदेखील मी करीत



नाही. माझ्या वाटेने मी चालत राहतो. त्या चालण्याचीच एक नशा चढते अंगात एक वेगळीच ऊब येते, डोळ्यांत नवी चमक येते."

'ज्वाला' या कथेत वेणूच्या अकाली उद्ध्वस्त झालेल्या भावजीवनाचे प्रत्ययकारी चित्र लेखकाने रेखाटले आहे. वेणूच्या स्वप्नसृष्टीचे दर्शन घडवितांना निवेदन येते:

"नक्षत्रासारखी ती पोर होती. तिचे तारुण्य नुकतेच कुठे मोहोरले होते. केसांत फुले माळावी, गोड गाणी गुणगुणावी, समवयस्क मैत्रिणींबरोबर खेळावे, गुजगोष्टी कराव्या, आणि पतीच्या प्रीतीची झिमझिम सारखी अंगावर पडत राहावी असे तिच्या जीविताचे स्वप्न होते. . ." नंतर मात्र स्वप्नाची शकले झाली. हृदय विदीर्ण झाले. . . वठलेले झाड जसे वर्षानुवर्षे उभे राहते तसे तिला जगायचे होते.

'बोट बुडाली' मधील प्रवासातील क्षणचित्रांचे वर्णन लेखकाने केले आहे:

"आणि धरमतर लाईनची बोट आपल्याभोवती लाटांच्या फेसाळ उंचवट्याच्या सुंदर आकृती निर्माण करीत मार्गस्थ झाली. बोटीचा ठिपका झाला. ठिपक्याचा धूर झाला आणि मग क्षितिजावर निळ्या डोंगरात निळा धूर विरून गेला."

नेमक्या आणि मोजक्या शब्दांत रंगविभ्रमांसह चित्रमालिका येथे साकार होते. वातावरणनिर्मिती होते. बोटीच्या प्रवासातील विविध प्रवृत्तींच्या माणसांचे वैविध्य लेखकाने त्यांच्या हालचालींसह प्रवाही शैलीत येथे रेखाटले आहे. तीत अंगभूत लालित्य आहे. विसंगती हेरण्याचे सामर्थ्य आहे. यामुळे भोवतालचा पट विणला जातो. उदा.

"... एका अतिसंवेदनक्षम माणसाला बोटीच्या धडपडीतून गाण्याची तीच तीच ओळ त्याच्या इच्छेविरुद्ध ऐकायला येत होती. आणि एक तरुण लेखक आपल्या कृत्रिम भावनांची पोचट अंडी उबवत बसला होता."

या पार्श्वभूमीवर जगूची व्यक्तिरेखा साकार होते. त्याच्या स्वप्नाळू वृत्तीचे दर्शन घडते. या वर्णनातील काव्यात्मकता विलोभनीय आहे.

"आनंदाचे बुडबुडे इंद्रधनुष्याचे रंग घेऊन त्याच्या आयुष्यात सारखे लवथवत होते. क्षणभर त्याच्या वृत्तीला स्थैर्य नव्हते. त्याची कल्पना आडवाटेने सारखी बागडत आणि धावत होती. त्याच्या कल्पनेत किनाऱ्यावरचे डोंगर म्हणजे समुद्रात क्रीडेकरिता उतरलेले हत्ती होते. पाऊस म्हणजे त्यांनी सोंडेतून उडवलेले फवारे होते आणि फिकट सूर्यबिंब म्हणजे त्यांनी आकाशात भिरकावलेले जास्वंदीचे लाल लाल फूल होते. वस्तूमात्रांचे, घटनांचे सर्वसामान्य स्वरूप त्याच्या मनात एकदम

बदलून जाई. त्याचे मन म्हणजे गमतीदार आकृतींचा, भडक रंगांचा आणि नाचऱ्या सुरांचा एक प्रचंड कल्लोळ होता. तेथे काल नव्हता, उद्या नव्हता, फक्त आज होता – हा क्षण होता.''

हे काव्यमय वर्णन कथेच्या सजावटीसाठी आलेले नाही. त्याचे कथावस्तूत नेमके प्रयोजन आहे. बोट बुडण्याच्या पुढच्या विनाशकारी क्षणापूर्वीच्या उत्फुल्ल जिजिविषेचे ते प्रतीकात्म चित्र आहे. मानवी जाणीव-नेणिवेचा शोध येथे आहे. लेखकाचे सूत्रमय निवेदन येते: ''. . . त्या बोटीवरचे ते चिमुकले विश्व म्हणजे विश्वकर्म्याच्या एका वेडाची लहर होती, निर्दय मस्करी होती.''

बोट बुडल्यानंतरच्या प्रसंगाचे चित्रण लेखकाने काव्यात्म शैलीत केले आहे. प्रलयंकारी प्रमाथी कालपुरुषाच्या तांडवाचे ते विदारक रूप आहे: ''आणि माणसांच्या त्या जगाच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडाल्या. माणसांच्या मनावरचे सारे संस्कार आणि सारी बंधने क्षणार्धात लुप्त झाली आणि त्यांच्या मनातल्या मूलभूत उघड्याबोडक्या प्रवृत्ती तेवढ्या शिल्लक राहिल्या. भीतीने साऱ्यांच्या काळजाचे लचके तोडले, आणि छातीवर पंजा रोवून ती गुरगुरत राहिली आणि तिच्या पिसाळलेल्या नजरेत त्या कल्पनाशून्यांना साक्षात मृत्यूचे दर्शन घडले. काळाकभिन्न, निर्विकार असा तो अज्ञातातून पावले टाकीत आला. त्याच्या आगमनाने प्रकाशाचे धुके विरले. सारी जडसृष्टी विरघळली. कालगतीचा दुवा तुटला. आपल्या कराल पंजात त्याने त्या साऱ्या माणसांना करकचून आवळले त्याच्या बर्फासारख्या स्पर्शाने सारे बधिर झाले.''

''. . . तेवढ्यात तिसऱ्या लाटेने दणका हाणला. बोट पूर्णपणे कलंडली. आणि पाणी शोषून घेत खाली गेली – तळाला. पाण्याचा प्रचंड खोल भोवरा झाला, चहूकडे फेस फसफसला, प्रचंड खळखळाट झाला, आणि पाण्याचे फवारे उंच उडाले.''

नेमके याच्या उलट 'जत्रेतील चष्मा' या कथेत कल्पनाविश्वात तन्मय झालेल्या माणसाच्या प्रसन्न भाववृत्तींचे चित्रण निसर्गप्रतिमांच्या साहाय्याने लेखकाने केलेले आहे. कथानिवेदकाची मन:स्पंदने येथे चित्रमय आकार धारण करतात :

''. . . आणि उन्मत्त आनंदाचे दारूकाम माझ्या हृदयात सुरू झाले. रंगीबेरंगी ठिणग्यांचे फवारे जागोजाग उडू लागले. त्या फवाऱ्यांच्या क्षणाक्षणाला नवनवीन आकृती होऊ लागल्या. प्रकाशाच्या वृक्षावरून तेजाची फुले गळू लागली. गरगरणाऱ्या चक्रांचे रंग परस्परांत मिसळले आणि इंद्रधनुष्ये निर्माण झाली. चंद्रज्योती प्रकाशाच्या विविधरंगी कळ्यांसारख्या वाटल्या आणि त्यांनी



ठिकठिकाणी वेलबुट्टीची गुंफण केली. आनंदाचे बाण ठिणग्यांचा पाऊस पाडीत आकाशाला जाऊन भिडले. उन्मादाचे स्फोट झाले आणि त्यांतून प्रकाशाची फुलपाखरे बाहेर पडून इतस्ततः भिरभिरू लागली.''

'चंद्रबिंबावरचे ससे', 'देवाच्या निळ्या अंगणात भिरभिरणारी फुलपाखरे' व 'निळ्या प्रकाशाचे चिमुकले निळे जग' यासारख्या नितांत रमणीय प्रतिमांची पखरण या कथेत आहे. जीवनकलहाचा तवंग मनावर येऊ न देता तरल संवेदना सर्व छटांसह अंग प्रत्यंगात अनुभवण्याचे स्वप्न कथानिवेदकाने उराशी बाळगलेले आहे :

''. . . आणि एका चंद्रकिरणावर बसून तरंगत तरंगत मी अलगद पृथ्वीच्या टेकाडावर येऊन उतरलो. झिम-झिम-झिम चंद्रकिरणांचा पाऊस पडत होता. आणि म्हणून सगळे रुपेरी झाले होते. रुपेरी कुरणे, रुपेरी झाडे, चांदीचा ओहोळ आणि त्याचे रुपेरी गाणे! थंडाव्याची ओंजळ भरून वारा लहान मुलासारखा सावकाश जपून चालत होता आणि त्याच्या ओंजळीतला थंडावा सगळीकडे झिरपत होता.''

या कथेतील निवेदन काव्यात्म वीण घेऊनच येते. काव्यात्म संस्कार करणारी व निरागस भावविश्वात घेऊन जाणारी ही कथा आहे.

'पावसाळी हवा' या कथेत पहाटे येऊन गेलेल्या पावसाच्या सरीनंतरचे आसमंतातील रमणीयतेचे वर्णन लेखकाने केलेले आहे. त्या पार्श्वभूमीवर कथानिवेदकाच्या आंतरिक अनुभूतीचे पारदर्शक चित्रण केलेले आहे.

''. . . जागेपणीच झोपेची सुस्ती मी अनुभवली. एक प्रकारची सौम्य प्रसन्नता येऊन मला बिलगली आणि जलबिंदूंनी डवरलेल्या अर्धोन्मीलित मोगऱ्याच्या कळीप्रमाणे माझ्या मनाची स्थिती झाली.''

पावसानंतर झाडांची कांती एकदम कशी बदलली. मानवी स्वभावातील मार्दव भाव तिने कसे धारण केले याविषयी तपशील येथे येतो. कथानिवेदकाच्या भावतंद्रीचे चित्र रेखाटले जाते :

''. . . आणि विश्वाच्या कोषात मी एकट्यानेच युगानुयुगे निद्रा केली.'' उन्हाळ्याच्या तापाने संत्रस्त झालेल्या, गुदमरलेल्या जीवाला तल्लखी आल्यानंतरचा अनुभव प्रत्ययकारी शब्दांत रेखाटलेला आहे :

''. . . आता पावसाची चांगली काळोखी आली होती आणि त्याने संथ धार धरली होती. थंडाव्याने तुडुंब भरलेली हवा अगदी सुस्तावली होती. पावसाच्या आवाजाची लय सर्वत्र भरून राहिली होती आणि मधूनमधून खिडकीतून येणाऱ्या

फवाऱ्यामुळे सुखद संवेदना शरीरभर पसरत होत्या.''

या कथेत कथानायकाच्या संवेदना प्रवाहाची लय निसर्गप्रतिमांच्या माध्यमातून सर्वत्र खेळती राहिलेली आहे.

'चक्र' या कथेतही पावसाळ्यातील निसर्गरंगांचे, त्यांतील विभ्रमांचे रूप-रस-गंध-स्पर्श-नादमय असे उत्कट, तरल चित्र रेखाटले आहे. चेतनगुणोक्तीमुळे त्यात जिवंतपणा आलेला आहे.

''. . . मी सभोवती दूरवर एक नजर टाकली. धरित्रीच्या रंध्रारंध्रातून हिरवे हिरवे जीवन नुसते उफाळले होते.

''. . . नजरेच्या टप्प्यापर्यंत माना उंचावून झाडी माझ्याकडे पाहत होती. जीवनाचा हिरवा समुद्र नुसता उसळत होता आणि त्या होमकुंडात स्वर्गीय नैवेद्याचा हा स्वाहाकार चालला होता. कोसळणारे जलप्रवाह मंत्रघोष करीत होते. त्या महायज्ञाची पूर्तता आता होत आली होती.''

विनाश पावणाऱ्या विराट विश्वाची अगतिकता पाहून कथानिवेदकाच्या अंतरंगात एका नव्या अस्तित्वाची जाणीव झंकारून गेली. त्या अननुभूत क्षणाचे काव्यात्म वर्णन लेखकाने केलेले आहे.

''. . . तो ध्वनी ऐकून माझ्या मनातले बेगडी शहाणपण सारे वितळून गेले, जाणिवेच्या कक्षा रुंदावल्या, मनाची द्वारे खडाखड उघडली आणि जमिनीपर्यंत लवून प्रणाम करून मी त्या नव्या विशाल अनुभूतीचे, त्या विराट भयानक अस्तित्वाचे स्वागत केले. . . शांतीचा कधी न आटणारा प्रवाह हृदयातून झुळूझुळू वाहू लागला.''

'थांब उद्याचे माऊली' या कथेत गर्भवतीच्या भाववृत्तींचे चित्र रेखाटले आहे. तिच्या स्वप्नांची उभारी, मनातील ताण आणि जाणिवतेतील गहिरेपणा यांची या कथेत संमिश्र वीण आढळून येते. तिच्या शारीर-मानस अवस्थांचे चित्र संज्ञाप्रवाहाद्वारे रेखाटलेले आहे.

शिवलिंगाला कुमुदने प्रणाम केला तेव्हा तिच्या अंतर्मनात अमूर्त पातळीवर अनेक संवेदनांसह पुढील चित्र साकार झाले :

''. . . तत्क्षणी शिवलिंगातून अर्धनारीनटेश्वर प्रकट झाले. मृदुंगाचा खोल गंभीर ध्वनी घुमला आणि त्याच्या तालावर विराट नृत्याला प्रारंभ झाला. अपरंपार वेदना, भावनांचा प्रचंड कल्लोळ आणि निर्मितीचा विलक्षण साक्षात्कार ह्यांनी भारावलेले ते नृत्य सावकाश कितीतरी वेळ चालले होते.''



या तरल मनोवृत्तीबरोबर भीतिग्रस्ततेची जाणीवही मनात जागृत होते :

''. . .पाहता पाहता त्या देवालयाची प्रचंड गुहा झाली. त्या गुहेत शेकडो आदिमानव एकमेकांच्या गळ्यात हात गुंतवून फेर धरून नाचत होते. हळू, सावकाश, कंटाळवाण्या तालावर त्यांची पावले पुढे मागे होत होती. त्यांचे पशूसारखे चेहरे मध्यभागी पेटविलेल्या अग्नीच्या लालसर ज्वालांनी उजळले होते. कसला तरी भयानक उत्कट भाव त्यावर व्यक्त होत होता. दारूची मडकी फेसाने दरदरली होती आणि त्या अग्नीवर संथपणे भाजल्या जाणाऱ्या मांसाचा गंध भरून राहिला होता. त्या मांसातून गळणारी चरबी विस्तवाच्या ज्वाला चाटत होत्या.''

''आणि एकदम कुमुदच्या ध्यानात आले की, भाजले जाणारे मांस स्वत:चेच आहे.''

आपला पती माधव याच्या समवेत ती वाळूत जाऊन बसते. दूरचे दीपगृह डोळे मिचकावीत असताना ती पाण्यात उभी राहते. त्यावेळच्या तिच्या भावतरंगांचे वर्णन लेखकाने केले आहे. ''. . . ओसरणाऱ्या पाण्याबरोबर तिच्या पायाखालची वाळू पळून जाऊ लागली आणि त्यामुळे वाटणारी भीती आणि सुख अनुभवण्यासाठी तिने डोळे मिटून घेतले. असाच भयमिश्रित आनंद ती अलीकडे अनुभवीत होती.''

मधून मधून अधांतरी प्रकाशाचे थेंब तरंगताना तिला दिसतात. . .जवळच्या बंगल्यातला निळा प्रकाश वत्सलतेचे निळे अंगाईगीत म्हणताना तिला ऐकू येतो. तिच्या भाववृत्ती उचंबळून येतात.

'बिनचेहऱ्याची संध्याकाळ' या कथेत महानगरातील वास्तवाचे भेदक दर्शन लेखकाने घडविलेले आहे. सामुहिक मनाचे प्रभावी चित्र या कथेत रेखाटले गेले आहे. काव्यात्म शैलीला येथे वाव नाही. तरीदेखील लेखकाने चित्रकाराच्या कौशल्याने मोजक्याच रेषांनी, मोजक्याच रंगांनी जनजीवनातील आणि वातावरणातील उदासवाणा स्वर पकडलेला आहे.

कथेच्या प्रारंभीच वर्णन येते :

''नेहमीप्रमाणे मुंबईतील ती संध्याकाळ मलूल होती. तिच्या भुऱ्या केसांवर सूर्यकिरणांची धूळ उडाली होती आणि तिला मुळी चेहराच नव्हता, खरोखर किती भयंकर गोष्ट होती ही! बिनचेहऱ्याची संध्याकाळ. पण त्याचे कोणालाच काही वाटत नव्हते. मलाही काही वाटत नव्हते. रमतगमत, पायांच्या कात्रीने रस्ता कापीत मी घरी चाललो होतो. इतर असंख्य पायांच्या कात्र्या तेच करीत होत्या. किती गमतीदार! पण त्याचे कोणालाच हसू येत नव्हते.''

असुरक्षित विश्वाचे प्रतीकात्म चित्र पुढील शब्दांतून आकार घेते. ". . .मानवी जीविताची जत्रा! तिच्यातले मुख्य आकर्षण – गरगरा फिरणारा भीतीचा पाळणा!

". . . भीती! वृत्तपत्रांच्या ठळक काळ्या मथळ्यांतील भीती! जाड काळी अक्षरे रांगेने उभ्या राहिलेल्या अनेक भीत्या! बिनचेहेऱ्यांच्या! भव्यतेची भीती आणि क्षुद्रतेची! ज्ञानाची आणि अज्ञानाची! बंधनाची आणि स्वातंत्र्याचीही! इतरांची आणि स्वत:चीही"

". . . भीतीचे अजस्त्र वळवळणारे साप! आणि शिड्या! आयुष्य हा साप आणि शिड्यांचा खेळ आहे. शिड्यांनी वर जायचे. सापांनी गिळल्यावर खाली यायचे. मोठ्या शिड्यांच्या शेजारी मोठे साप! खूप उंच आणि खाली हातांत खुळखुळणारे, पण अज्ञात भवितव्य! भीतीचा गरगरा फिरणारा पाळणा"

कथेच्या प्रारंभीच्या प्रतिमेचे आवर्तन शेवटीही होते. त्यामुळे कथेला जीवनदर्शनाची वेगळी मिती प्राप्त होते.

'काजवा' या कथेत स्पंदनलयीला जीवनचिंतनाचे परिमाण लाभते. संवाद साधणाऱ्या शैलीत मनातील व्याकुळता, अनामिक असोशी, अगतिकता यांचे भावसंकुल, आर्त विश्व साकार होते. या शोकात्म अनुभवाची वीण काव्यात्म आहे: "तुम्ही वेदना पाहिल्या आहेत का? तरवारीच्या निळ्या पात्यासारख्या! दर प्रहारागणीक अंगाचे तुकडे-तुकडे करणाऱ्या! सहस्त्रावधी इंगळ्यासारख्या अंगाला डसणाऱ्या! धुणे पिळावे तशी आतडी पिळणाऱ्या! घशाला इतका शोष पाडणाऱ्या की, त्यामुळे टाळू आत ओढली जावी! दर श्वासागणीक आपली फुफ्फुसे लोखंडी पिंजऱ्यात कोंबून ठेवली आहेत असे वाटायला लावणाऱ्या! जाडशा फळकुटाच्या प्रहाराने पाय मोडल्यावर ज्या मोन्या पण असह्य कळा येतात तशा कळा आणणाऱ्या!

पाहिल्या आहेत का तुम्ही वेदना?"

अशा भासचित्रांतून वास्तव आणि स्वप्न यांच्या पातळ्या समेवर येतात. अमूर्ताला मूर्त स्वरूप प्राप्त होते. 'काजवा' मध्ये जीवनजाणिवेतील अरूपाला रूप देण्याचा यशस्वी प्रयत्न केलेला आहे. 'काजवा' प्रमाणेच 'माणूस, परी आणि कासव' ही कथाही फँटसी, प्रतीक आणि संज्ञाप्रवाह या त्रिमितींनी विकसित होत गेलेली आहे. गाडगीळांच्या अभिव्यक्तिसामर्थ्यातील प्रयोगशीलतेच्या खुणा अशा कथांतून दिसतात. या कथेत कासव हे सनातन निसर्गचक्राचे प्रतीक आहे. परी हे दैवाचे प्रतीक आहे. ती माणसाशी अनेक प्रकारचे खेळ करू शकते;



निसर्गचक्राशी नाही असे या कथेचे आशयसूत्र सांगता येईल. या कथेतील निवेदनाचे कहाणीच्या पारंपारिक शैलीशी नाते आहे. या कथेची सुरुवात या दृष्टीने पाहणे आवश्यक आहे :

". . . सूर्यकिरणांच्या झोतावरून घसरगुंडीचा खेळ खेळत ती खाली उतरली. भूमीचा स्पर्श व्हायच्या आधीच ती थबकली आणि तिने इकडेतिकडे पाहिले. एका सशाच्या पिलाला तिने कुत्र्याच्या तोंडात दिले आणि त्याच्या उष्ण, लालभडक रक्ताने आपले ओठ रंगवले. आपला काळा चष्मा लावून तिने एका ढगाकडे पाहिले आणि त्या ढगाचे सोने झाले. एका झोपलेल्या तरुणाच्या मस्तकावर तिने आपली छत्री उघडून धरली आणि त्याच्या जीवनात एक स्वप्न उमलले. महत्त्वाकांक्षेच्या घोड्यावर तो स्वार झाला आणि त्या दूर पळणाऱ्या स्वप्नाला पकडण्यासाठी धावू लागला, जन्माचा दु:खी झाला."

जीवनातील गहनगूढ आशयाला, त्यातील गुंतागुंतीला आणि माणसाच्या संवेदनस्वभावाला कवेत घेण्याची क्षमता या साध्या, प्रवाही आणि काव्यात्म शैलीत आहे.

'ओले उन्ह' या कथेत निसर्गप्रतिमायुक्त निवेदनातून पात्रांच्या भावस्थितीचे वर्णन येते; आशयाला पोषक अशी वातावरणनिर्मिती होते.

". . .खूप दिवस सतत पडल्यावर पाऊस उघडला होता. आकाश कसे मोकळे झाले होते. उंच उंच गेले होते आणि सकाळचे तान्हे उन्ह समोरच्या टेकडीवर उतरले होते. . . ."

". . . जमीन अजून ओली होती, झाडी ओली होती व हवादेखील ओलीच होती आणि त्या भिजलेल्या सकाळी एक चिमणी माझ्या खिडकीत बसून आपले पंख कोरडे करीत होती."

या कथेच्या शेवटी आलेल्या प्रतिमामालिकांतून निराशायुक्त जीवन विसरून नव्या उभारीने जीवन जगू पाहणाऱ्या मन:प्रवृत्तीचे दर्शन घडते. निसर्ग आणि मानवी मन यांच्या एकतानतेचे चित्र लेखकाने रेखाटले आहे :

"कुंपणावरची फुले उन्हात पिवळी धम्मक दिसत होती आणि एक फुलपाखरू कुंपणाच्या कडेकडेने चालले होते.

. . . आळसावलेल्या मनाने मी ह्या दृश्याकडे पाहत होतो. विचार सगळे संपले होते. सहजपणे माझ्या वृत्ती त्या दृश्याशी एकरूप झाल्या होत्या."

'दोघी' या कथेत निसर्गप्रतिमांची वातावरणनिर्मिती साधलेली आहे. कथेतील

घटना आणि प्रसंग यांच्या परिपोषासाठी ती अनुकूल ठरलेली आहे. महाबलीपुरमच्या प्राचीन देवालयातील शिल्पकलेचा सौंदर्यानुभव घ्यायला निघालेल्या माणसांच्या मनोवृत्तीतील भावच्छटाही लेखकाने अतिशय समरसतेने येथे रेखाटलेल्या आहेत : ''मध्येच एका रानवेलीवर साधीसुधी पांढरी फुले फुलली होती. लोभावलेले एक पिवळे फुलपाखरू त्यांच्याजवळ पंखांची उघडमीट करीत होते.''

''. . . सकाळचे ऊन आपल्या झळाळीने ह्या नित्याच्या दृश्यावर सुरूपतेचा वर्ख चढवित होते आणि उंचावरचे निळे आकाश म्हटले तर स्निग्ध होते आणि म्हटले तर तटस्थ होते.''

''त्या हवेत आकाश अगदी खाली आल्यासारखे वाटत होते आणि त्या आवारातील सुरूच्या जातीची असंख्य झाडे वाऱ्यावर झुलत, लवलवत्या फांद्यांनी आकाशाला गोंजारत होती. एकमेकांच्या कानात कुजबुजत होती. वाऱ्याची जोरात झुळूक आली की, आनंदाचे सुस्कारे सोडत होती. पूर्वेच्या बाजूला मऊ, चमकती पुळण सावकाश उतरत दूरवर समुद्राला भेटायला गेली होती. समुद्र इतका दूर होता की, क्षितिजाने त्याला शोषून घेतल्यासारखे वाटत होते. दूरवर त्याचा निळा गडद पट्टा दिसत होता. पण त्याच्या अस्पष्ट पण गंभीर घोषाने मात्र सारे वातावरण भरून आणि भारून टाकले होते.''

'गर्ता' या कथेत वार्धक्याकडे झुकलेल्या काकासाहेबांची व्यक्तिरेखा अतिशय प्रभावीपणे लेखकाने रेखाटली आहे. एका स्मरणरमणीय विश्वात रमणारे, हळव्या स्वभावाचे आणि वास्तव जगात अगतिकता अनुभवणारे काकासाहेब येथे दिसतात. त्यांच्या संवेदनाप्रवाहाच्या लयीचे वर्णन निसर्गाच्या साहचर्याने लेखकाने केलेले आहे. काकासाहेबांच्या जाणीव-नेणिवेच्या खोल डोहात डूब घेण्याचा प्रयत्न तेथे दिसतो.

''. . . . त्यांचे हात काम करायचे थांबतात. धोतराच्या सोग्याने ते कपाळ टिपतात. श्रांतपणे मागे असलेल्या एका चौथऱ्याला टेकतात. डोळे मिटून घेतात. त्यांच्या डोळ्यांपुढे काळीनिळी वर्तुळे नाचतात. मस्तकातली नाडी थडथडत राहते. जाणिवेच्या पाहाऱ्यातून काही क्षण निसटतात. शून्यपणा शिल्लक राहतो.''

संवेदनशक्ती एकवटून निसर्गाच्या रंगरूपाशी तन्मय होणाऱ्या काकासाहेबांचे स्वप्नविश्व असे साकार होते :

''. . . . समोर पानांची हिरवी हिरवी गर्दी असते. त्या हिरव्या दृश्याचे निरनिराळे भाग वेगळे करण्याचा प्रयत्नदेखील ते करत नाहीत. नुसते ते हिरवेपण



त्यांच्या डोळ्यांना सुखावत राहते. पण हळूहळू त्या हिरवेपणातून प्रत्येक झाड आणि त्यांची पाने वेगवेगळी होतात. त्या वाटेने त्यांची नजर आत आत जाते. झाडांचे बुंधे तिला अटकाव करतात. मग ती वर चढू लागते. आणि एकदम त्या हिरवेपणातून एक हिरवे छप्पर निराळे होते. लहानसे, लाजाळू, अगदी आत आत जाऊन झाडांच्या आत दडलेले, तक्रार न करता एकाकीपणीने राहाणारे.'' कथेचा शेवटही परिणामकारक आहे.

काकासाहेबांच्या मनातील आंतरिक कल्लोळ आणि दीपस्तंभाची उघडमीट यातील नाते शोधण्याचा प्रयत्न लेखकाने केलेला आहे :

''. . . . दीपस्तंभाचा दिवा लागतो. मालवतो. पुन्हा लागतो. पुन्हा मालवतो. त्याच्या प्रकाशाचा फवारा काहीसे शोधीत दूरवर पसरतो आणि मग अदृश्य होतो.''

निसर्गप्रतिमा आणि काव्यात्मकता यांच्या संदर्भात विचार करतांना, गंगाधर गाडगीळांच्या कथाविश्वातील 'तलावातले चांदणे' या कथेचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. कथानिवेदकाच्या हृदयसंवादातून दांपत्यजीवनातील उत्फुल्ल क्षणांचे चित्र साकार होते. ते भावसमृद्ध आहे. तरल आहे. विलोभनीय आहे.

नुकत्याच घेतलेल्या निरोपाच्या क्षणापासून प्रारंभ करून भूतकाळातील मुग्ध प्रीतिविश्वात कथानायक रममाण होतो. त्याच्या हृदयरंगांतील ताल आणि तोल निसर्ग प्रतिमांनी समुचित पद्धतीने रेखाटण्यात आलेला आहे. पार्थिव प्रेमाच्या छटा रंगवीत असतानाच अपार्थिव, अम्लान प्रीतिभावनेचा गोफही येथे गुंफलेला आहे. तारुण्य सुलभ वयातील थरथरत्या स्पंदनांचे आलेखन आहे. प्रीतिविश्वातील सारे रूपविभ्रम एकतानतेने या कथेत रंगविले आहेत. शारीर-मानस भाव येथे एकवटले आहेत.

कथेच्या सुरुवातीला त्यांच्या अंत:करणातील भावविभ्रम प्रकट होतात :

''. . . . आताच तू गेलीस. अजून तुझ्या स्पर्शाने हललेली ती जास्वंदीची फांदी डुलत आहे आणि माझे मन अनेक मधुर स्मृतींनी आणि भावनांनी त्या फुललेल्या शेवग्यासारखे मोहरून गेले आहे. असे कां झाले आहे ते सांगता येत नाही.''

संपूर्ण कथेला ही काव्यात्म वीण प्राप्त झालेली आहे. रूप-रस-गंध-स्पर्शमय सृष्टीतील चैतन्य तीत ओथंबून आलेले आहे. निवेदनात्मकेत सर्वत्र प्रसन्नता व्यापून राहिली आहे.

पत्नीच्या मातृत्वाच्या पहिल्या पदचिन्हांविषयी कथानायक उद्‌गारतो :

“. . . . समोरच्या शेवग्याची फांदीन् फांदी फुलून तो पांढरा शुभ्र झाला आहे. नाजूक फुलांनी डवरला आहे. रसरशीत केळ घडाच्या भाराने अंमळ लवली आहे. कलत्या दिवसाचे उन्ह पायऱ्या चढून वर आले आहे. हवेत गारवा ओथंबला आहे. गर्भवतीच्या जपून टाकलेल्या पावलासारखी वाऱ्याची हालचाल होत आहे. सगळे कसे निवांत आहे. . . ”

या कथेत नायिकेचा नायकाशी झालेला संवाद आढळत नाही. प्रथमपुरुषी निवेदनातून ही कथा फुलत जाते. घटनाप्रसंगांचे चढ-उतार येथे नाहीत. गुंतागुंत नाही. समरप्रसंग नाहीत. जीवनपटावरील दोन जीवांच्या प्रीतीचे विलोभनीय इंद्रधनुष्य येथे दिसते. कथानायकाच्या जीवनातील नितांत मनोहर क्षणांचे प्रतिबिंब येथे पडलेले आहे. . . तलावातले चांदणे. . . मनाच्या नितळ तलावात हे चांदणे निथळत राहते. चांदणे आणि तलाव येथे एकमेकांपासून दूर येत नाहीत. येथे तलावच चांदणे झालेला आहे.

गंगाधर गाडगीळांच्या तरल मनोविश्व रेखाटणाऱ्या सर्व कथांचा हा परामर्श नव्हे. त्यांच्या कथाकार म्हणून सिद्ध झालेल्या प्रकृतिधर्मातील गुणवैशिष्ट्यांसंबंधी आस्वादाच्या अंगाने नोंदविलेली ही काही निरीक्षणे.

या कथांतून गाडगीळ यांच्या आधुनिक संवेदनशीलतेचे दर्शन घडते. लेखक म्हणून त्यांचे व्यक्तिमत्त्व सदैव जागृत असते, पण जीवनव्यूहाचे कलात्मक चित्रण करताना ते कमालीची तटस्थता बाळगतात. जीवनाविषयी व मानवी स्वभावाविषयी त्यांना विलक्षण कुतूहल आहे. त्यांच्या व्यक्तिरेखांच्या अंतरंगात भावनांची उत्कटता आहे; पण भावविवशतेचा सूर नाही. लेखक म्हणून आत्मभान त्यांनी ठेवलले आहे. कथन अथवा निवेदनात्मकता हे कथेचे एक महत्त्वाचे उपांग आहे. तीत संवाद येतील, प्रतिमांकित अनुभव येतील, पण कथा हा पृथगात्म असा आकृतिबंध आहे याची जाणीव या स्वरूपाच्या कथांतूनही दिसते. कथामाध्यमावरची घट्ट पकड हा गाडगीळांच्या प्रतिभेचा गुणविशेष आहे. माणसाचा शोध हा त्यांच्या अनुभूतीचा मूलकंद आहे. माणसाच्या अंतर्यामीच्या चैतन्याचे स्फुरणच त्यांच्या काव्यात्मक स्वरूपाच्या कथेतून दृग्गोचर होते. त्यांच्या कथेत निसर्ग येतो तोही माणूस आणि निसर्ग यांच्या अनुबंधाच्या जाणिवेतूनच.

❒❒❒